**फिर्यादी पक्षातर्फे विधिज्ञ श्री. ए. एस. धोंडगे यांच्यामार्फत साक्षीदाराचा पुढील सरतपास शपथेवर सुरु–**

आता मला दिनांक ०२.१२.२०१४ रोजीचे आरोपीला वसुलीकरिता दिलेले पत्राची प्रत दाखवली. त्यावर व्यवस्थापकीय संचालक यांची सही आहे ती मी ओळखतो. त्यावर आरोपी याने प्रत मिळाल्याबाबत केलेली सही व अंगठा आहे. ते मी ओळखतो. आरोपीच्या खात्याचे विवरण पत्र दाखवले. आता मला दिनांक २३.०७.२०१५ रोजीचे आरोपीला वसुलीकरिता दिलेले पत्राची कार्बन प्रत दाखवली. त्यावर वितरण अधिकारी यांची सही आहे ती मी ओळखतो. त्यावर आरोपी याने प्रत मिळाल्याबाबत केलेली सही आहे. ती मी ओळखतो. आता मला आरोपीने औरंगाबाद जिल्हा सहकारी दुध यांना करुन दिलेले नोटरी शपथपत्र दाखवले. त्यावर आरोपीची सही आहे ती मी ओळखतो. (आरोपीचे विधवान विधिज्ञांनी उपरोक्त एकाही दस्तऐवजावर साक्षीदाराची सही नसल्याने त्यास निशाणी देण्यास विरोध दर्शवला. आदेश– दिनांक ०२.१२.२०१४ रोजी व दिनांक २३.०७.२०१५ रोजीचे पत्र साक्षीदार कार्यरत असलेल्या संस्थेकडुन देण्यात आलेले असुन त्यावरील कर्मचा–याची सही त्याने ओळखलेले आहे. तसेच आरोपीने सदर संस्थेला दिलेले शपथपत्र हे नोटरायज असुन असुन त्यावर सही सुध्दा साक्षीदाराने ओळखलेले आहे. त्यामुळे सदर दस्तांना निशाणी देण्यास अडचण येणार नाही करिता आरोपीच्या विधवान वकीलांचा आक्षेप फेटाळुन दिनांक ०२.१२.२०१४ रोजीच्या पत्राला **नि.क्रं. ६६** देण्यात येते. आरोपीचे शपथपत्र याला **नि.क्रं. ६७** देण्यात येते. दिनांक २३.०७.२०१५ रोजीच्या पत्राला **नि.क्रं. ६८** देण्यात येते.) तथापी आरोपीच्या खात्याचे विवरणपत्रावर संबंधित संस्थेचा सही व शिक्का नसल्याने त्यास निशाणी देण्यात येत नाही.

**फिर्यादीच्या तोंडी विनंतीवरुन सरतपासणी पुढील तारखेपर्यत तहकुब करण्यात आली.**

SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Digitally signed by SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Date: 2024.07.16 13:39:14 +0530

**( एस.एल. रामटेके)**

**दिनांक १६.०७.२०२४** **१४ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**औरंगाबाद.**